# मेट्रो ३ भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचा ४१ वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून तानसा २ या रॉबिन्स बनावटीच्या टनेल

## मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक पूर्ण

बोअरिंग मशीनद्वारे भुयारीकरण करण्यात आले. महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक हा डाऊन लाइन मार्गाचा ८३२.५ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ५५५ रिंग्जच्या सहाय्याने २६२ दिवसांत पूर्ण करण्यात आला.

कुलाबा ते सीप्झपर्यंत मेट्रो ३ कॉरिडॉरचे संपूर्ण डाऊन लाइन भुयार पूर्ण झाले आहे. मेट्रो ३ च्या १०० टक्के भुयारीकरण पूर्णतेच्या प्रतीक्षेत असल्याचे एमएमआरडीए आणि एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक एसव्हीआर श्रीनिवास यांनी स्पष्ट केले. मेट्रो ३ मार्गिकेतील पॅकेज ३ मध्ये पाच स्थानके असून मार्गिकेतील सर्वात लांब टप्पा आहे. या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. मेट्रो ३ पॅकेजच्या भुयारीकरणांतर्गत सायन्स म्युझियम ते वरळी, सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी, महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल या तीन टप्प्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

*मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस अ‍ॅवॉर्ड्स २०२२ समारंभात एन्व्हॉर्नमेंट एनिशिएटिव्ह ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त झाला असून एमएमआरसीएलचे संचालक एस. के. गुप्ता यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मुळे वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होणार असून शहरातील वाहतूक कोंडी कमी होणार असल्याचे यावेळेस स्पष्ट करण्यात आले आहे.*